# पणन संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे

**नवीन मध्यवर्ती इमारत, तिसरा मजला, पुणे-४११ ००१.**

पीबीएक्स-०२०-२६१२६६२८/२६४२६७८५/२६११४०६४

Email-dirmktms@gmail.com


जा.क्र.पणन-५/स्थापत्य/ कलम १२ (१)प्रस्ताव/परिपत्रक /२०२० /3688 दिनांक :-१२ /११ /२०२०

## प रि प त्रक

विषय:- महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १२ (१) अन्वये मान्यतेसाठी सादर करण्यात येणा-या प्रस्तावांबाबत...

राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये विविध विकास कामे केली जातात . ज्यामध्ये प्रामुख्याने बाजार समितीसाठी जागा खरेदी करणे, जागेची विक्री करणे बांधकाम करणे , फर्निचर खरेदी, मालमत्ता भाडेपटयाने देणे विदयुतीकरण करणे इत्यादीचा समावेश होतो. सदरचे प्रस्तावास मंजूरी बाबतच्या मर्यादेचे अधिकार शासनाच्या सहकार , पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दिनांक १५/११/२०१८ रोजीच्या अधिसुचनेने खालील प्रमाणे प्रदान करण्यात आलेले आहे .

| अ.क्र (१) | पदनाम (२) | प्रदान करण्यात आलेले अधिकार (३) |
|---|---|---|
| १ | पणन संचालक | रु.५० लाखाचे वरील स्थावर व रु.१० लाखावरील जंगम मालमत्तेचे कलम १२ (१) चे अधिकार |
| २ | विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था | रु.२५ लाखावरील ते रु.५० लाख पर्यंतचे स्थावर व रु.५ लाखावरील ते रु.१० लाखापर्यंतचे जंगम मालमत्तेचे कलम १२ (१) चे अधिकार |
| ३ | जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था | रु.१० लाखावरील ते रु.२५ लाख पर्यंतचे स्थावर व रु.१ लाखावरील ते रु.५ लाखापर्यंतचे जंगम मालमत्तेचे कलम १२ (१) चे अधिकार |
| ४ | उप/ सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था | रु.१० लाख पर्यंतचे स्थावर व रु.१ लाखपर्यंतचे जंगम मालमत्तेचे कलम १२ (१) चे अधिकार |

त्या नुसार क्षेत्रीय अधिका-यांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे. तथापि या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की , महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १२ (१) अन्वये मान्यतेसाठीचे ज्या प्रस्तावास पणन संचालकांची मंजूरी आवश्यक आहे ते प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयाकडून थेट पणन संचालनालयात न पाठविता विभागीय सहनिबंधक कार्यालयामार्फत सादर करण्यात येतात त्यामुळे बराच कालावधी जातो व प्रस्तावावर कार्यवाही होण्यास विलंब होतो.

तरी या परिपत्रकाद्वारे सर्व क्षेत्रिय अधिका-यांना सुचित करण्यात येते की, शासनाच्या दिनांक १५/११/२०१८ रोजीच्या अधिसुचनेनुसार तालुका सहाय्यक / उपनिबंधक , जिल्हा उपनिबंधक , सहनिबंधक सहकारी संस्था यांनी त्यांच्या मर्यादेतील प्रस्तावावर कार्यवाही त्यांचे स्तरावर करावी व पणन संचालनालयाच्या कक्षेतील प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक यांनी थेट पणन संचालनालयास पाठवावेत .

( सतिश सोनी )
पणन संचालक
महाराष्ट्र राज्य ,पुणे

प्रति,
१)विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व )
२)जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था (सर्व)
३)उपनिबंधक/ सहाय्यक निबंधक सहकारी संस्था( सर्व )
४) सचिव / सभापती, कृषि उत्पन्न बाजार समिती (सर्व)